③

५२९९९

कायम विना-अनुदान तत्वावर.

आ.क्र.प्रा/प्राशि/मा.म्यास/परवान/९९/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : - 4 OCT 1999

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, . पुणे . . . . . . . .

विषय = सन १९९९ - २००० या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.... [इंग्रजी माध्यम]

संदर्भ = शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक - व्हीएलएस = १०९८/[४५०]/प्राशि-२, दि. २८ जानेवारी, १९९९.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९९९ पासून इयत्ता १ली ते ४ थी पर्यंत सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस - शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर कायम विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव. | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १] | विद्यानिकेतन एज्युकेशन ट्रस्ट मांगरवाडी, लोणावळा, जि. पुणे. | सरस्वती विद्यामंदिर १३-ए, रामदास हॉल मांगरवाडी, लोणावळा, जि. पुणे | १ ली ची एक तुकडी | इंग्रजी |

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. अशाप्रकारे नियुक्त केलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाबाबत/निवृत्ती वेतनाबाबत शासन जबाबदार राहणार नाही. वेतन व निवृत्तीवेतन विषयक फायदे संबंधित संस्थानीच द्यावे लागतील.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहीजेत.

...२...

२.७ संस्थेने शाळेत आवश्यक शिस्त [illegible] ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपद्धतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारची गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

७] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे = १. करिता

प्रत : प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका, शिक्षण मंडळ, लोणावळा जिल्हा पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : मा. सचिव,
विद्या निकेतन एज्युकेशन ट्रस्ट, भांगरवाडी, लोणावळा, जि. पुणे.
यांना माहितीसाठी अग्रेषित.

सन १९९८-९९ या वर्षी [जून १९९८ पासून] इंग्रजी माध्यमाच्या नवीन प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्र. व्हीएसएन/१०९८/[४५०]प्राशि-३ दि. २८.१.९९

| क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे ठिकाण |
|---|---|---|
| १] | विद्यानिकेतन एज्युकेशन ट्रस्ट, भांगरवाडी लोणावळा जि. पुणे. | १३-ए, रामदरा हौसिंग, भांगरवाडी, लोणावळा, जि. पुणे. |

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १. करिता.

परवानगी वर्ष : २००५-२००६      जा.क्र. माध्य. ३(१२) /प्रथम मान्यता/पुवि/२००५-०६
माध्यम : इंग्रजी      शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे -१ यांचे कार्यालय.
दिनांक : 14 OCT 2008

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद पुणे.

विषय : प्रथम मान्यता सन २००५-२००६

संदर्भ 1. आपले पत्र कमांक : शिक्षण/माध्य-९/१३१३/०८ दि. १३/१०/०८

2. शा.प.क. नमाशा१३/१०/०/२००६/(१५८/२००६) माशि-१ दि.१६/०५/०६ व दि.२१/०५/०६

3. कार्यालयाचे पत्र कं माध्य-३(१२)/नमाशा/मान्यता/पुवि२००८/१३/१०/०८

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२, व ३.३ अन्वये **विद्यानिकेतन एज्युकेशनल टस्ट** संस्थेच्या **ॲड.बापूसाहेब भोंडे हायस्कुल लोणावळा** माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गात २००५-२००६ या शैक्षणिक वर्पासाठी जून २००५ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्ततेस अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे? याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे? यावावतही अहवाल प्रस्तावासोबत पााठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीचे शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विपयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून घ्यावी.
८. वाढिव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यानां सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोवतच्या त्रुटिची पूर्तता करण्याच्या सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.याची स्वाक्षरी असे

**(बाळासाहेब ओव्हाळ)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे- १ करिता**

प्रत :

१. मुख्याध्यापक :
**ॲड.बापूसाहेब भोंडे हायस्कुल**
**लोणावळा.**

२. निवडनस्ती :

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भुवन"
जा. क्र. जिप/शिक्षण /प्राथ/२/२१/[illegible]/२००३
पुणे. दिनांक :- /११/२००३

(6)

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

सरस्वती विद्यालय, लोणावळा
ता. मावळ

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील" शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम-इंग्रजी)

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२/)/प्राशि-३
दिनांक :- १४ जानेवारी २००३

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम / जादा तुकडया / वर्ग जून - २००२ पासून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा / नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | सरस्वती विद्यालय, लोणावळा ता. मावळ | इंग्रजी | इ. ९ली १ तुकडी अतिरिक्त<br>इ. २ ते ६वी प्रत्येकी एक तुकडी नैसर्गिक वाढ | | कायम विनाअनुदान तत्वावर |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहीजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे.
३. सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाहो. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विदयार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद करणेत येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष

विद्यानिकेतन एज्यु. ट्रस्ट, लोणावळा.

C:\My Documents\kendre\Doc2.doc
**कायम विनाअनुदानतत्वावर**

**पुणे जिल्हा परिषद,पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्रं.जिप/शिक्षण/प्राथ.२/२१/ ११४ /०४**
**पुणे १ दि. २४/ १ /२००४**

**प्रति,**
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सरस्वती विद्यामंदिर,
भांगरवाडी - लोणावळा ता. मावळ - जि. पुणे.

**विषयः**-इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदान तत्वावरील शासन मान्यतप्राप्त खाजगीप्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्य प्रथम/जादा तुकडया/वर्गउघडण्यास परवानगी देणे बाबत (माध्यम-इंग्रजी)
**संदर्भः**- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-२००२/(१०००/०२)/प्राशि-३ दिनांकः-१४ जानेवारी २००३

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडय/वर्ग जून २००४ पासून सन २००४ - २००५ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसगिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सरस्वती विद्यामंदिर भांगरवाडी - लोणावळा ता. मावळ | इंग्रजी | सातवी — दुसरी — | नैसर्गिक वाढ अतिरिक्त | मंजूर एक तुकडी कायम विनाअनुदान तत्वावर |

अटी व शर्ती
१)शाळेस शासनाने वेळोवेळी विहीत केल्या नूसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हतेचा व आवश्य सक्षम कर्मचारी वृंद
शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे
२) सदर शाळेने तुकडया साठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापण विषयक सुविधा उपलब्ध करुन
नेमला पाहीजे .
३) सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत
परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तूकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी /वर्ग मान्यता रदद करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे**करिता

**प्रतः- माहिती व योग्य त्या कार्यवहीसाठी रवाना.**

१) सचिव/अध्यक्ष,
विद्या निकेतन एज्युकेशन ट्रस्ट
लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे.

(४)

कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/खा.प्रा.शा./८०/ दि.१/१०/०६
०३ जाने २००६

प्रति,
~~मुख्याध्यापक~~,/मुख्याध्यापिका,
ॲड. बापूसाहेब गोंडे हायस्कूल
लोणावळा

विषय :- कायम-विना-अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्राथम / जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-१००२/ ( १०००,०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जून २०० पासून सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲड. बापूसाहेब गोंडे हायस्कूल, लोणावळा | इंग्रजी | इ.३री दुसरी तुकडी २००६-०६; ~~इ.४थी दुसरी तुकडी~~ २००६-०७ | जादा | मंजूर |

## अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाचा व पिण्याच्या पाण्याचा सोय चांगला असावयास हवा.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

टिप→ शैक्षणिक वर्ष ०६-०७ ची शिक्षक संच निश्चिती त्वरीत करून घ्यावी.

शिक्षणाधिकारी. (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद.पुणे करिता

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.

१. सचिव / अध्यक्ष,
ॲड बापूसाहेब गोंडे हायस्कूल
लोणावळा

(21)

२९६९-९२

**कायम विना अनुदान**
जून २००५ पासून इ. ८ वी इंग्रजी

जा.क्र. माध्य-३(१२)/नमाशा/मान्यता/पुवि/२००८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 13 OCT 2008

प्रति,

सचिव,
विद्यानिकेतन ए.ट्रस्ट, भांगरवाडी, लोणावळा, जि. पुणे

विषय : **सन २००५ -२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत . . .**

संदर्भ : १) शासन पत्र क्रमांक-नमाशा/२००६/(१५८/२००६)माशि-१, दि. १६/५/२००६ व दि.३१/५/२००
२) या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००६, दि.७/६/२००६ व दि.१५/६/२००६.
३) शासनपत्र क्रमांक-नमाशा/२००६(४५७/२००६)माशि-१, दि.१८/७/२००६.
४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक-माध्य-३/१४/नमाशा/रद्द/पुवि/२००६, दि.३१/७/२००६.
५) शासनपत्र क्रमांक-न्यायाप्र/२००८(१९२/२००८)माशि-१, दि.१७/३/२००८.
६) या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दि.२२/४/२००७ व २७/५/२००८.
७) या कार्यालयाचे पत्र दि.१६/६/२००८.
८) शासनपत्र क्रमांक माशानू-२००८/(५९४/०८)माशि-१, दि.७/७/२००८.
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.,पुणे यांचे पत्र क्रमांक-शिक्षण/माध्य-९/१२७६/०८ दि १/१०/२००८.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून **जून २००५** पासून **कायम विनाअनुदान तत्वावर** विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बार्बीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यानिकेतन ए.ट्रस्ट, भांगरवाडी, लोणावळा, जि. पुणे | लोणावळा, पुणे | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

१. आपल्या संस्थेची वरती नमूद केलेल्या नवीन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यांत आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
३. **'कायम विना अनुदान तत्वावर मिळालेली शाळा'** असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा पध्दतीने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे .
४. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकारी यांचेशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना **'कायम विनाअनुदानित शाळा'** अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
५. सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
६. सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
७. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावे.
८. जादा उघडण्यांत आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राध्यान्याने देण्यांत यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यांत येवू नये.
९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यांत येवू नये...
१०. माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यांत येईल.

namasha stancil

(23)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (माध्य.)
जा.क्र.शिक्षण/माध्य-९/१३२४/०८
पुणे १ दिनांक :- १५/१०/२००८

प्रति,
मुख्या.
ॲड. बापूसाहेब भोंडे हायस्कूल
लोणावळा

विषय - नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.
२००६-०७, २००७-०८ इ. ९ वी व इ. १० वी

आपल्या विद्यानिकेतन एज्यु. ट्रस्ट या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलीत ॲड. बापूसाहेब भोंडे हायस्कूल, लोणावळा या माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी चा वर्ग सुरु करणेस सन् २००५-२००६ या शेक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य ३(१२)/प्रथम मान्यता/पुवि/२००५-०६ दि.१४.१०.२००८ अन्वये मान्यता मिळाली आहे. सन् २००६-०७ या वर्षापासून इ. ९ वी व सन् २००७-०८ या वर्षापासून इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने आपल्या विद्यालयात चालू झाला आहे. सदर वर्गास जून २००६ पासून इ.९ वी व जून २००७ प.सून इ.१० वी च्या वर्गास नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घ्यावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा.

आपल्या माध्यमिक शाळेत इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असलेने आपण मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचेकडे सांकेतांक मिळणेकरीता संपर्क साधावा.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता

D:N-Pol:Let